**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.inWebsite: http://www.dte.org.in

क्रमांक: १/तंशिसं/२०१२/
दिनांक:-

प्रति,

सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे,नाशिक,नागपूर,औरंगाबाद,अमरावती.

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे
मुंबई ५१.

विषयः- शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतने/शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामधील पी.एचडी.साठी प्रतिनियुक्त केलेल्या किंवा अध्ययन रजा मंजूर केलेल्या अध्यापकांची सध्यस्थिती.

तंत्र शिक्षण संचालनालयाकडून शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतने/शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामधील अध्यापकांना पी.एचडी. साठी प्रतिनियुक्त केले जाते आणि त्यासाठी विशेष अध्ययन रजा मंजूर केली जाते.

मात्र सदर अध्यापक प्रतिनियुक्ती/रजेनंतर संस्थेमध्ये रुजू झाले तरी त्यांनी पी.एचडी. चे कार्य पूर्ण केले किंवा कसे तसेच सदर पदवी त्यांना कधी प्राप्त झाली याबाबतचा कोणताही अभिलेख वा कागदपत्रे संचालनालयाकडे उपलब्ध करुन दिली जात नसल्याने याबाबतचा "डेटाबेस" तंत्र शिक्षण संचालनालयामध्ये उपलब्ध नाही.

तेव्हा उपरोक्त प्रमाणे प्रतिनियुक्त केलेल्या अथवा अध्ययन रजा मंजूर केलेल्या अध्यापकांची सध्यस्थिती सोबतच्या प्रपत्रात दिनांक ७/१२/२०१२ पर्यंत संचालनालयास उपलब्ध करुन द्यावी.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहपत्रः- प्रपत्र

पृ. क्र. विज्ञा/आस्था/पीएचडी/२०१२/३११०
दिनांक :- ०३/१२/२०१२

प्रतिलिपी :-
प्राचार्य, शा. अभि महा अमरावती / शा. औ. नि. शा. महा. अमरावती
प्राचार्य, शा. तं. नि अमरावती / यवतमाळ / वाशीम / खामगाव / मुर्तिजापूर / महिला यवतमाळ /
डॉ. पंजाबराव देशमुख हॉ, अमरावती / शिवाजी अंजनगाव इन्स्टीट्यूट फार्मसी अकोला
योना माहितीस्तव आ.क्रा. करिता.

सहसंचालक
तंत्र शिक्षण अमरावती

# प्रपत्र

संस्थेचे नांवः-

| अ. क्र. | अध्यापकांचे नांव | पदनाम | प्रतिनियुक्ती/अध्ययन रजा मंजूरीचा कालावधी | | प्रथमतः प्रतिनियुक्ती/रजा मंजूरीचा आदेश क्रमांक व दिनांक | प्रतिनियुक्ती/रजेनंतर कर्तव्यावर रुजू झाल्याचा दिनांक | पी.एचडी. पदवी प्रदान झाल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | | | |
| | | | | | | | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी

टिपः- १. रजा मंजूरी/प्रतिनियुक्तीसाठी एका पेक्षा जास्त आदेश निर्गमित झाले असल्यास केवळ प्रथम आदेशाचा संदर्भ रकान्यात नमूद करुन अन्य माहिती "शेरा" रकान्यात नमूद करावी.

२. आदेश निघाले असतील परंतु प्रत्यक्ष पी.एचडी. साठी गेले नसल्यास सदर माहिती "शेरा" रकान्यात नमूद करावी.

३. पी.एचडी. प्रदान झालेल्या प्रकरणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी व "शेरा" रकान्यात तसे केल्याचे नमूद करावे. ज्या प्रकरणी पदवीची प्रत जोडलेली नाही त्याप्रकरणी पी.एचडी. चे कार्य अपूर्ण असून पदवी प्रदान न झाल्याचे शेऱ्यात स्पष्टपणे नमूद करावे.

४. ज्या प्रकरणी शासनाकडून प्रतिनियुक्तीशिवाय वा अध्ययन रजा मंजूरी शिवाय स्वखर्चाने पी.एचडी. केली असेल अशा अध्यापकांच्या नावाचा समावेश प्रपत्रात करण्यात येऊ नये.